## ३७. २ महिन्यापेक्षा लहान बाळ –ताप आणि खोकला

(लहान मुलांचे आजार)

| आजाराची पायरी | खाणाखुणा | काय करायला पाहिजे |
|---|---|---|
| न्यूमोनिया नाही | श्वसनवेग ६० पेक्षा कमी बरगडी फार आत खेचली जात नाही | आईला सांगा बाळाला उबेत ठेवा, अंगावर पाजत राहा, नाक चोंदले असल्यास साफ करा (मीठपाण्याचे थेंब टाकून) मात्र आजार वाढला, किंवा श्वसनाला जास्त त्रास होत असेल, किंवा दूध पिणे बंद झाल्यास बाळाला परत दाखवायला सांगा. |
| गंभीर न्यूमोनिया | श्वसनवेग ६० पेक्षा जास्त किंवा बरगडी खूप आत खेचली जात असल्यास | ताबडतोब हॉस्पिटलमध्ये पाठवा मात्र कोझालचा एक डोस देऊन पाठवा. बाळाला पाठवताना उबदार गुंडाळून घ्या. पाजणे चालू ठेवा. जर पाठवणी शक्य नसेल तरच गावात उपचार करा |
| अतिगंभीर न्यूमोनिया | दूध पीत नाही, झटके, गुंगीत–झोपाळू, बाळ रडत नसूनही कण्हणे आंणि श्वासाची शिट्टी वाजणे, तपमान कमी यापैकी काहीही खाणाखुणा असल्यास | कोझाल देऊन हॉस्पिटलला पाठवा |